ठाणे, गुरुवार दि. २७ जून २०२४ वर्ष : १३, अंक : ६० , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**संसदेचे पावसाळी अधिवेशन**

देशात तिसऱ्यांदा मोदी सरकार केंद्रात सत्तेवर आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पंतप्रधान पदी निवड करण्यात आली आहे. एनडीएला बहुमत मिळाल्यानंतर संसदेच्या सभागृहात लोकसभा ......पान २ वर



तुम्हीही थंडगार 'मोहब्बत का शरबत' पिताय का?

...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३६° से | २९° से |

**बाजार**


| सोने | चांदी |
|---|---|
| ७१,६०० | ८७,३९० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



आपल्यापेक्षा स्टँडर्ड याचक आहेत ते! निवडणुकीदरम्यान ते आता कंपन्यांना आर्थिक दान मागतात.

## लोकसभा अध्यक्षपदी ओम बिर्ला यांची निवड...



बुधवारी लोकसभा अध्यक्षपदाची निवडणूक होती. यावेळी एनडीएन ओम बिर्ला यांना पुन्हा उमेदवारी दिली. तर इंडिया आघाडीने सुरेश यांना उमेदवारी दिली होती. यावेळी ध्वनिमत घेण्यात आलं. त्यात ओम बिर्ला हे विजयी झाला. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे ओम बिर्ला यांना लोकसभा अध्यक्षांच्या खुर्चीपर्यंत घेऊन गेले. यावेळी मोदी आणि राहुल गांधी पहिल्यांदाच समोरासमोर आले. दोघांनीही एकमेकांशी हस्तांदोलन करत स्मित हास्य केलं. दोन्ही नेत्यांनी जेव्हा एकमेकांशी हस्तांदोलन केलं तेव्हा सर्वच खासदार भारावून गेले. खासदारांनी टाळ्या वाजवून दोन्ही नेत्यांचं स्वागत केलं. त्यानंतर दोन्ही नेत्यांनी ओम बिर्ला यांना सन्मानाने अध्यक्षांच्या खुर्चीपर्यंत नेलं. हे चित्र लोकसभेसाठी अत्यंत अनोखं असं होतं.

### महाराष्ट्र विधान परिषदेच्या चार जागांसाठी मतदान संपन्न

# कोकण विभाग मतदार संघात 59.31 टक्के मतदान

ठाणे – काल पदवीधर व शिक्षक मतदारसंघासाठी मतदान झाले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात आजची महत्त्वाची निवडणूक होती. त्यामुळे यात कोणता पक्ष बाजी मरणार हे काल झालेल्या मतदानामुळे ठरणार आहे. कोकण विभाग मतदार संघातून सायं ५ वाजेपर्यंत ५४.५८ टक्के मतदान झाले., तर रायगड जिल्ह्यातून ६१.९८ टक्के मतदान झाले. पालघर जिल्ह्यातून ५९.१७ टक्के मतदान झाले, (पान २ वर)

मतदारांची गर्दी...



ठाणे जिल्ह्यात 54.28 टक्के मतदान

### डावरखे विरूध्द कीर यांची चूरशीची लढत

कोकण पदवीधर मतदार संघात १३ उमेदवार रिंगणात आहेत. या निवडणुकीत काँग्रेस विरुद्ध भाजप अशीच मुख्य लढत पाहायला मिळत आहे. काँग्रेसकडून रमेश कीर तर भाजपकडून निरंजन डावखरे हे दोघे उमेदवारीच्या रिंगणात उतरले आहेत. दरम्यान, निरंजन डावखरे सलग दोन वेळा कोकण पदवीधर मतदारसंघातून आमदार राहिले आहे. त्यामुळे यंदा हॅट्रीक होते का हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.



कोकण पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीचे मतदान बुधवारी संपन्न झाले यावेळी कोकण पदवीधर मतदार संघातील महायुतीचे उमेदवार निरंजन डावखरे व आमदार संजय केळकर यांच्या सह पदवीधरांनी ठाण्यातील सरस्वती स्कुलच्या मतदान केंद्रावर मतदान केले. (छाया –मनोज सिंह)

# धोकादायक इमारतींबाबत धोरण ठरविणार –मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

### 'दरड कोसळण्याच्या घटनांपासून मुक्त मुंबई' हे आमचे लक्ष्य

मुंबई – मुंबई शहरातील दरडप्रवण क्षेत्रात सेफ्टी नेट बसवून ही क्षेत्रे अधिक संरक्षित करणे आणि तेथील नागरिकांच्या जीविताची काळजी घेणे हे आमचे प्राधान्य असून दरड कोसळण्याच्या घटनांपासून मुक्त मुंबई बनविण्याचे आमचे लक्ष्य आहे. (सविस्तर वृत्त पान २ वर)





**थोडक्यात घडामोडी**

### माजी नगरसेवक विलास मोरे यांचे निधन

ठाणे – धर्मवीर आनंद दिघे यांचे कट्टर अनुयायी, ठाणे महानगर पालिकेचे माजी नगरसेवक विलास धोंडू मोरे यांचे आज निधन झाले. त्यांचे अग्निसंस्कार ठाण्यातील जवाहर बाग येथील स्मशानभूमीत करण्यात आले. यावेळी त्यांचे मित्र मंडळी, नातेवाईक आणि शिवसैनिकांनी प्रचंड गर्दी केली होती. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, जावई आणि भावंडे असा मोठा परिवार आहे.



नव्वदीच्या दशकात ठाण्यातील गोकुळ नगर येथून ते शिवसेनेच्या तिकिटावर नगरसेवक म्हणून निवडून आले होते. त्याच प्रमाणे ते ठाणे परिवहन समितीवर देखील होते. आनंद दिघेंचा मोठा प्रभाव असलेले विलास मोरे हे शिवसैनिकांमध्ये चांगलेच लोकप्रिय होत. त्यांच्या इमानदारीची आणि स्वच्छ चारित्र्याची मिसाल खुद्द आनंद दिघे सगळ्यांना देत असत. विलास मोरे यांनी 'आनंद वेध' या मासिकाचे प्रकाशन करून धर्मवीर आनंद दिघे यांचा जीवनप्रवास, ठाण्यातील विविध सांस्कृतिक, पर्यटन, सामाजिक घडामोडींचा वेध ते वाचकांपर्यंत मांडत असत. २०१६ साली त्यांना ठाणे महानगरपालिकेच्या वर्धापन दिनी 'ठाणे गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. लक्ष्मी नगर येथे त्यांचे कार्य सुरू झाले ते मरे पर्यंत त्याच चाळीत राहिले. त्यांच्या जाण्याने जुन्या शिवसैनिकांमध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### भारत सरकार टांकसाळ, मुंबई यांच्याकडून ठाणे महापालिकेस

# सीएसआर निधीतून चार एक्स रे मशीन झाल्या उपलब्ध





ठाणे – मुंबई येथील भारत सरकारच्या टांकसाळीच्या सीएसआर फंडातून ठाणे महापालिकेस चार पोर्टेबल एक्स रे मशीन्स (क्ष किरण प्रतिमा यंत्र) छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपलब्ध झाल्या आहेत. त्यापैकी दोन मशीन्स छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे तर उर्वरित दोन मशीन महापालिकेची आरोग्य केंद्रे व बाह्य रुग्ण तपासणी शिबिरांसाठी वापरण्यात येणार आहेत.

ठाणे महापालिकेस सीएसआर निधी उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे फेब्रुवारी २०२४ मध्ये मागणी नोंदवण्यात आली होती. त्यानुसार, सिक्युरिटी प्रिंटिंग अँड मिंटिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड अंतर्गत असलेल्या भारत सरकार टांकसाळ, मुंबई यांच्यातर्फे एक कोटी २१ लाख रुपये एवढा निधी उपलब्ध झाला. या निधीतून त्यांनी महापालिकेस चार पोर्टेबल एक्सरे मशीन उपलब्ध करून दिल्या. या मशीन्स नुकत्याच छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे दाखल झाल्या आहेत. ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी या निधी उपलब्धतेबद्दल भारत सरकार टांकसाळ यांचे आभार मानले असून या मशीन्समुळे रुग्णसेवेला फायदा होईल, अशा भावना व्यक्त केल्या आहेत.

महापालिकेतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या बाह्य रुग्ण तपासणी शिबिरात एक्स रे त्वरित उपलब्ध होत नव्हता. त्यामुळे, रुग्णाला मोफत एक्स रेसाठी महापालिकेच्या आरोग्य केंद्र किंवा पालिकेशी संलग्न असलेल्या खाजगी लॅबमध्ये जावे लागत होते.

अशा स्थितीत सुमारे ५० टक्के (पान २ वर)

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य समता दिंडी




ठाणे –आरक्षणाचे जनक, रयतेचा जाणता लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज सकाळी १०.३० वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. जुने जिल्हा परिषद कार्यालय, मराठी ग्रंथसंग्रहालय, तलावपाली ठाणे येथे आंतरराष्ट्रीय मादक द्रव्य पदार्थ सेवन विरोधी दिन साजरा (पान २ वर)



# आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त ठाणे पोलिसांची जनजागृती

**ठाणे – ठाणे अंमली पदार्थ तस्करीचे जंक्शन झाल्याने ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी पोलीस अधिकाऱ्यांना तस्करांचे कंबरडे मोडण्याचे निर्देश दिले. त्याचबरोबर शाळा कॉलेज , निर्जन ठिकाणी लक्ष केंद्रित करीत सेवन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. त्याच सोबत हद्दीतील संभावित ठिकाणी पोलिसांनी गस्ती सुरु केल्या. तर अमली विरोधी पथकाने धडक कारवाया करीत अंमली पदार्थ तस्करांचे रॅकेट खणून काढले.**

अमली विरोधी पथकाने १ जानेवारी ते २३ जून, २०२४ दरम्यान तब्बल ५५ कोटी ७६ लाख १० हजाराचे अंमली पदार्थ जप्त केलेलं आहेत. तर २ हजार ५८६ गुन्हे दाखल करीत २ हजार ७२४ आरोपीना रास्ता दाखविण्यात पोलिसांना यश लाभले आहे. बुधवारी(ता–२६ जून) रोजी ठाणे पोलिसांनी ठाण्यात जनजागृती करीत चित्ररथ आणि विद्यार्थी रैलीचे अनावरण ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या हस्ते करण्यात आले. समाजात फोफावणारी अंमली पदार्थ सेवन करण्याची (पान २ वर)

■ अंमली पदार्थ २५८६ गुन्हे दाखल २,७२४ आरोपी अटक, ५५.७६ कोटींचा माल जप्त

■ चित्ररथ आणि विद्यार्थी रैलीचे अनावरण




(छाया – मनोज सिंह)

### अंमली पदार्थ खरेदी-विक्री २ हजार ५८६ गुन्हे दाखल प्रकरणी २ हजार ५८६ गुन्हे दाखल

ठाणे पोलिसांच्या गुन्हे शाखा आणि अंमली विरोधी पथकाने १ जानेवारी ते आजपावेतो केलेल्या धडक कारवाईमध्ये पोलिसांनी अंमली पदार्थ खरेदी-विक्री प्रकरणी २,५८६ गुन्हे दाखल करून २,७२४ आरोपीना अटक केलेली आहे.

■ ठाणे पोलिसांनी २,५४१ जणांवर गुन्हे दाखल करून २,६१२ आरोपींवर कारवाई करण्यात आली.

■ अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणाऱ्या ७१ तस्करांवर गुन्हे दाखल करीत ११२ आरोपींना अटक करण्यात आली. तर एकूण ५५ कोटी ७६ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

■ ठाण्याच्या कासारवडवली येथील खाडी किनारच्या रेव्ह पार्टीवर छापेमारी करून ५ आरोपींवर गुन्हा दाखल करून ७ लाख ८५ हजाराचे अंमली पदार्थ हस्तगत केले.

■ गुन्हे शाखा युनिट-१ कासारवडवली पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात १५ ग्राम एमडी हस्तगत केला. सखोल तपासानंतर उत्तर प्रदेशातील अमली पदार्थ कारखानाच उद्ध्वस्त केला. ४५ कोटींचा ३ किलो १६४ ग्राम एमडी हस्तगत केला.

■ गुन्हे शाखा युनिट-३ कल्याण दोन आरोपींना अटक करून ३ किलो ४ ग्राम अंमली पदार्थ ४ कोटी ५० लाखाचा अमली पदार्थ जप्त केला.

■ अंमली विरोधी पथकाने ८ आरोपींना अटक करून ३१ लाख ४८ हजार रुपयांचा ३१४.८ ग्राम एमडी हस्तगत केला. ४ किलो ८५० ग्राम चरस हस्तगत केला. त्याची किंमत २४ लाख २५ हजार रुपये आहे. तर सादर आरोपींवर संघटित गुन्हेगारी अंतर्गत मोक्का नुसार कारवाई केली.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## संसदेचे पावसाळी अधिवेशन

देशात तिसऱ्यांदा मोदी सरकार केंद्रात सत्तेवर आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पंतप्रधान पदी निवड करण्यात आली आहे. एनडीएला बहुमत मिळाल्यानंतर संसदेच्या सभागृहात लोकसभा अध्यक्षांची निवड आवाजी मतदानाने करण्यात आली. १८ व्या लोकसभेच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा ओम बिर्ला यांची निवड करण्यात आली आहे. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी यासंदर्भातील घोषणा केली. या निवडीला काँग्रेस पक्षाने विरोध दर्शवला तसेच लोकसभा उपाध्यक्ष पद काँग्रेसला हवे असल्याने त्याबाबत सत्ताधारी पक्ष व विरोधी पक्षांशी चर्चा झाली. परंतु यातून काहीच मार्ग निघालेला नाही. त्यामुळे लोकसभा उपाध्यक्षपदासाठी निवडणूक होईल असे दिसते. सरकार स्थापन झाल्यानंतर संसदेच्या पावसाळी अधिवेशनात दोन दिवसांपूर्वी नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी घेण्यात आला. तसेच नुकताच उरलेल्या खासदारांचा शपथविधी पार पडला आहे. यावेळी विरोधकांची संख्या ही पूर्वीपेक्षा जास्त आहे. त्यामुळे विरोधकांच्या प्रश्नांना सत्ताधाऱ्यांना उत्तर द्यावे लागेल तसेच विरोधकांचे मत समजावून घ्यावे लागेल. या लोकसभा निवडणुकीच्या निकालाने लोकशाहीची बुज राखली आहे. कारण यावेळी विरोधकांची संख्या कमकुवत नाही हे विशेष होय. राहुल गांधी यांची विरोधी पक्षनेते पदी निवड निश्चित आहे. ते काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आहेत. सरकारच्या उणिवांवर नेमक्याप्रमाणे बोट ठेऊन वचक ठेवण्यासाठी राहुल गांधी शॅडो कॅबिनेट तयार करण्याच्या विचारात आहेत. केंद्रात नरेंद्र मोदींचे कॅबिनेट विरुद्ध राहुल गांधींचे शॅडो कॅबिनेट असा सामना रंगण्याची शक्यता आहे. यावेळी काँग्रेस आणि इंडिया आघाडीची ताकद वाढली असून राहुल गांधी विरोधी पक्षनेते बनणार आहेत. त्यामुळे मोदी सरकारवर वचक ठेवण्यासाठी राहुल गांधी नवी योजना बनवण्याच्या तयारीत आहेत. विशेष म्हणजे, शॅडो कॅबिनेटला कोणताही घटनात्मक दर्जा नसतो. पण सरकारच्या कामकाजावर नजर ठेवण्यासाठी विरोधक एक टीम बनवू शकतात आणि त्यांना वेगवेगळ्या मंत्रालयाच्या कामकाजावर नजर ठेवण्याची जबाबदारी दिली जाऊ शकते. अधिवेशनात मंत्र्यांना प्रश्न विचारण्यासाठी या शॅडो कॅबिनेटचा वापर होऊ शकतो. शॅडो कॅबिनेट ही संकल्पना पहिल्यांदा ब्रिटनमध्ये वापरण्यात आली. संसदेत विरोधी सदस्य त्याचा वापर सरकारच्या कामांवर लक्ष ठेवण्यासाठी करतात. ज्याला जी जबाबदारी मिळेल तो त्या विभागाशी संबंधित कामावर लक्ष ठेवेल आणि सरकारच्या उणिवा संसदेत मांडेल. यामध्ये कुणाला संरक्षण खात्याचे तर कुणाला वित्त, वाणिज्य, रेल्वे, आरोग्य खात्याचे शॅडो मिनिस्टर केले जाऊ शकते. सन १९९० मध्ये, जेव्हा सोनिया गांधी विरोधी पक्षाच्या नेत्या बनल्या तेव्हा त्यांनी वाजपेयी सरकारच्या कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी समित्या स्थापन केल्या. प्रणव मुखर्जी, अर्जुन सिंग आणि आनंद शर्मा यांसारख्या नेत्यांना वेगवेगळ्या मंत्रालयांच्या कामकाजावर देखरेख ठेवण्याची आणि अधिवेशनात महत्त्वाचे मुद्दे मांडण्याची जबाबदारी देण्यात आली होती. तसाच प्रयोग काँग्रेस व विरोधी पक्षांनी राबविण्याचा निर्णय घेतला आहे. राहुल गांधी हे लोकसभेचे विरोधी पक्षनेते बनणार हे निश्चित झाले आहे. यापूर्वी २०१४ आणि २०१९ मध्ये काँग्रेसकडे विरोधी पक्षनेते होण्यासाठी पक्षाकडे बहुमत नव्हते. लोकसभेतील विरोधी पक्षनेत्याची जबाबदारी मोठी असते. विरोधी पक्षनेत्याला कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा असतो आणि कोणत्याही कॅबिनेट मंत्र्याला दिल्या जाणाऱ्या सुविधा त्याला मिळतात. सरकारी कामासाठी स्वत:चे स्वतंत्र कार्यालय मिळते. यापूर्वी गांधी घराण्यातील राजीव गांधी आणि सोनिया गांधी यांनी विरोधी पक्षनेत्यांची भूमिका बजावली आहे. सीबीआय, सीईसी,सीवीसी, सीआयसी चे चेअरमन निवडण्यात विरोधी पक्षाच्या नेत्याची भूमिका असते. तसेच मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्षाची निवड करण्यात विरोधी पक्षनेते सहभागी होतील. न्यायमूर्तींच्या नियुक्तीमध्ये विरोधी पक्षनेत्याचा सहभाग असतो. संसदेच्या महत्त्वाच्या समित्यांमध्ये विरोधी पक्षनेत्याची भूमिका महत्त्वाची असते. लोकसभाध्यक्षांची नियुक्ती बिनविरोध करण्यासाठी भाजपच्या वतीने संरक्षणमंत्री राजनाथ सिंह व संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांच्यावर विरोधकांशी बोलणी करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. राजनाथ सिंह यांनी इंडिया आघाडीतील घटक पक्षांशी सोमवारीपासून फोनवरून संपर्क केला होता व सहमतीने लोकसभाध्यक्षांची निवड करण्याची विनंती केली होती. राजनाथ सिंह यांच्या प्रस्तावावर काँग्रेससह इंडियातील घटक पक्षांनी सहमतीही दाखवली होती. मात्र उपाध्यक्षपदाच्या मुद्द्यावर ही बोलणी फिस्कटली. अठराव्या लोकसभेचे पहिलेच अधिवेशन सुरू आहे. यंदा संसदेत विरोधकांचे संख्याबळ वाढल्यामुळे विरोधकांनी सरकारला घेरण्याची रणनीती आखल्याचे दिसते. पावसाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी अध्यक्षपदासाठी निवडणूक घेण्यात आले. एनडीएकडून ओम बिर्ला तर इंडिया आघाडीकडून केरळमधील काँग्रेसचे खासदार के. सुरेश निवडणुकीसाठी उभे होते. विरोधकांकडे पुरेसे संख्याबळ नसले तरी सरकारने उपाध्यक्ष देण्यास विरोध केल्यामुळे इंडिया आघाडीने ही निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला असल्याचे काँग्रेस नेत्यांनी म्हटले आहे. आवाजी मतदान प्रक्रियेत हंगामी अध्यक्षांनी ओम बिर्ला यांना विजयी घोषित केले.

**जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'**

☆ मिळकट नोटीस
☆ हस्तांतर करार नोटीस
☆ नोंदणी न्यास नोटीस
☆ निविदा जाहिरातीसाठी
☆ तहसिल जाहीरनामा
☆ कामगार न्यायालय नोटीस

- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771

* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबाबदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट
*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

# धोकादायक इमारतींबाबत धोरण ठरविणार –मुख्यमंत्री



मुंबई, दि. २६: मुंबई शहरातील दरडप्रवण क्षेत्रात सेफ्टी नेट बसवून ही क्षेत्रे अधिक संरक्षित करणे आणि तेथील नागरिकांच्या जीविताची काळजी घेणे हे आमचे प्राधान्य असून दरड कोसळण्याच्या घटनांपासून मुक्त मुंबई बनविण्याचे आमचे लक्ष्य आहे. याचबरोबर म्हाडा, महानगरपालिका, एमआयडीसी यासह इतर शासकीय यंत्रणांच्या सहकार्याने धोकादायक इमारतींबाबत धोरण ठरविणार असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मुंबईबाहेर गेलेला मुंबईकर पुन्हा त्यांच्या हक्काच्या घरात आणण्यास आमचे प्राधान्य असल्याचेही त्यांनी सांगितले.

### 'दरड कोसळण्याच्या घटनांपासून मुक्त मुंबई' हे आमचे लक्ष्य



मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी बुधवारी दुपारी घाटकोपर भागातील असाल्फ व्हिलेज येथील हनुमान टेकडी भागाला भेट दिली आणि त्याठिकाणी डोंगराला बसविण्यात येत असलेल्या सेफ्टी नेटची आणि इतर संरक्षणात्मक उपाययोजनांची पाहणी केली. यावेळी आमदार दिलीप लांडे, मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे यांच्यासह उपायुक्त रमाकांत बिरादार, उपायुक्त देविदास क्षीरसागर इतर वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्र्यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच हनुमान टेकडी येथे पाहणीनंतर प्रसारमाध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, यापूर्वी महापालिका अधिकाऱ्यांची बैठक घेतली तेव्हा मुंबईतील दरड प्रवण क्षेत्राचा सर्वे करण्यास सांगितले होते. त्यानुसार, मुंबई मध्ये एकूण ३१ दरड प्रवण क्षेत्र आहेत. त्यातील आज असल्फा विलेज येथील हनुमान टेकडी येथील सेफ्टी नेट बसवण्यात येत असलेल्या कामाची पाहणी केली. हे काम अतिशय अत्याधुनिक पद्धतीने करण्यात येत आहे त्यासाठी स्वीस तंत्रज्ञान उपयोगात आणण्यात येत आहे. खडकाच्या आत मध्ये आठ मीटर खोल इतके सुरक्षित पद्धतीने ही नेट बसवली जाते. त्यामुळे येथील सुरक्षितता अधिक वाढणार आहे. मुंबईत सर्व ३१ ठिकाणी हे काम सुरू आहे. कोणत्याच ठिकाणी दरड कोसळण्याच्या घटना घडू नये हे आमचे लक्ष्य आहे. दरड कोसळण्याच्या घटनांपासून मुक्त मुंबई आम्हाला बनवायची आहे. त्यादिशेने प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

ते म्हणाले की, २००१ मध्ये याच हनुमान टेकडी येथे दरड कोसळल्याची घटना घडून ७२ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. आता अशा घटना मुंबई मध्ये कुठेच घडू नयेत, यासाठी आमचा प्रयत्न आहे. ज्याप्रमाणे मुंबई – पुणे एक्स्प्रेस महामार्गावर सेफ्टी नेट बसवल्या, तशाच इथे बसवल्या जात आहेत. त्यामुळे याठिकाणी नागरिकांना अधिक सुरक्षितता मिळणार आहे. कोणाच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये यासाठी अशा प्रकारे डोंगराला सेफ्टी नेट बसवण्यात आली आहे. मुख्यमंत्री म्हणून माझी ती जबाबदारी आहे. त्यामुळेत याठिकाणी भेट देऊन पाहणी केली कारण, हे सर्वसामान्यांचं सरकार आहे. हजारो कुटुंबे याठिकाणी राहत आहेत. त्यामुळे त्यांच्या जीविताची काळजी आम्ही घेणे अपेक्षित आहे, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी नमूद केले.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे फुलांनी स्वागत

स्थानिक नागरिकांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी मुख्यमंत्री महोदय तीन वाजण्याच्या सुमारास हनुमान टेकडी येथे पोहोचले. त्यावेळी दरड कोसळण्याच्या घटनांपासून संरक्षणासाठी ज्या सेफ्टी नेट बसवल्या आहेत. त्यामुळे जीवाचा धीका कमी झाल्याची भावना व्यक्त केली. याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आणि त्यांच्यावर फुलांची उधळण करीत सहृद स्वागत केले.

### मुख्यमंत्र्यांचा चालत पायथा ते टेकडी थेट प्रवास

असल्फा विलेज येथील हनुमान टेकडी हा परिसर अतिशय दाटीवाटीने गजबजलेला आहे.हजारो कुटुंबे या ठिकाणी राहत आहेत.पायथ्यापासून वर टेकडीपर्यंत जाण्यासाठी अतिशय अरुंद, निमुळता आणि थेट वरपर्यंत जाणारा असा रस्ता. थोडसं चाललं तरी धाप लागावी असा हा मार्ग. मात्र, मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी पायथ्यापासून चालत थेट या मार्गाने टेकडी गाठली आणि तेथील डोंगराला बसवलेल्या सेफ्टी नेटची पाहणी केली.

# ठाणे गुन्हे शाखा खंडणी विरोधी पथकाची धडक कारवाई

ठाणे – एक किलो ८९० ग्राम अंमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या आरोपी अनिल कुमार प्रजापती याला गुरुवारी(ता–१३ जून) रोजी सापळा रचून अटक करण्यात आली. पोलीस पथकाने याच गुन्ह्यात उत्तरप्रदेश जि –प्रयागराज येथून अर्जुनकुमार प्रजापती तर नवीमुंबईतुन श्यामबाबू सरोज अशा तिघांना बेड्या ठोकण्यात यश मिळवले.

ठाणे गुन्हे शाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाने मिळालेल्या माहितीची खातर जमा करीत पोलीस पथकाने अनिलकुमार श्रीमुखलाल प्रजापती(४२) रा. सचिन शेठ चाळ, रूम नंबर ३, रामु नगर, पाईप लाईन रोड, भिवंडी, जि. ठाणे हा मूळचा रा. गाव दुसौती, पोस्ट सैदाबाद, ता– हंडीया जि. प्रयागराज राज्य उत्तरप्रदेश याला त्याच्याकडून अंगझडतीत १७ लाख २० हजार रुपयांचा १ किलो ७२० ग्राम अंमली पदार्थ चरस हा जप्त केला.त्याच्या विरोधात पोलीस ठाण्यात अंमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.





सदर प्रकरणी गुन्हे शाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचा होता. पोलीस पथकाने अटक आरोपी अमली पदार्थ विक्री करणारा अर्जुनकुमार जोखुलाल प्रजापती(३८) रा. गाव बिरगापुर, पोस्ट हनुमानगंज, ता– फुलपुर, जि. प्रयागराज, राज्य उत्तरप्रदेश याच्या नावाचा उलगडा झाला. पोलीस पथकाने प्रयागराज जिल्ह्यात पोहचून आरोपी अर्जुनकुमार याला गुरुवार (ता–२० जून) रोजी उत्तरप्रदेशातून अटक केली. चौकशीत त्याने त्याला आज हा अंमली पदार्थ श्यामबाबू प्रल्हाद सरोज(५१) रा. ई–१, ३५ सी–३, सेक्टर ८, नेरूळ नवीमुंबई परिसरात रिक्षा चालविण्याचा व्यवसाय करणारा आहे. तो मुळचा रा. बेलहा(गाव) सिंगमऊ, ता. हंडीया, जिल्हा प्रयागराज, राज्य उत्तरप्रदेश याला नवीमुंबई परिसरातून शुक्रवार (ता–२१ जून) रोजी अटक करण्यात आली. सोमवारी (त –२४ जून) रोजी पोलीस पथकाने त्याच्या नवीमुंबई येथील घराची झडती घेतल्यानंतर घरातुन १ लाख ७० हजाराचा १७० ग्राम चरस अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आला.

### १८.९० लाखाच्या १ किलो ८९० ग्राम चरससह तीन आरोपी गजाआड



ठाणे आयुक्तालयाच्या हद्दीतील शांती नगर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या एनडीपीएस गुन्ह्यात अटक केलेल्या एका आरोपीच्या चौकशीतून पोलीस पथकाने १८ लाख ९० हजाराचा अंमली पदार्थ चरस हा हस्तगत करीत एकूण तीन आरोपीना बेड्या ठोकण्यात यश मिळवले.

## सामाजिक न्यायाचे आरक्षणाचे जनक छत्रपती छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांना जयंती निमित्त भिवंडी महानगरपालिकेतर्फे विनम्र अभिवादन.

भिवंडी– शासन परिपत्रकानुसार व प्रशासक तथा आयुक्त अजय वैद्य यांच्या निर्देशानुसार छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीमध्ये यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. भारतातील एक महान राजा ज्यांनी शिक्षण सक्तीचे केले, गरिबांना शिकण्यासाठी भारतात पहिल्यांदाच वस्तीगृह निर्माण केले,अस्पृश्यता–जातीभेद नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले,विधवा विवाह,आंतरजातीय विवाह सुरू केला शेतकऱ्यांसाठी बाजारपेठा निर्माण केल्या,धरणे बांधली,शेतकरी उद्योगपती व्हावा म्हणून सहकारी तत्त्वाची सुरुवात केली, कुस्तीपटूंना व इतर कलाकारांना प्रोत्साहन व आर्थिक मदत केली. अशा महान राजाला आज भिवंडी महानगरपालिकेतर्फे अभिवादन करण्यांत आले.

सदर कार्यक्रमास उपायुक्त मुख्यालय नयना ससाणे, प्रभारी उपायुक्त प्रणाली घोंगे, अनिल येडके, सहाय्यक आयुक्त अनुराधा बाबर, सहा. आयुक्त सामान्य प्रशासन अजित महाडिक, शहर अभियंता सचिन नाईक, प्रभाग समिती क्र. १ चे राजेंद्र वरलीकर, जनसंपर्क अधिकारी मिलींद पळसुले व महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.



### सीएसआर निधीतून चार एक्स रे मशीन झाल्या उपलब्ध

(पान १ वरून) रुग्ण आवश्यकता असूनही एक्स रे काढणे टाळत असत. या पोर्टेबल एक्स रे मशीन्समुळे रुग्णाचा एक्स रे त्वरित लॅपटॉपवर उपलब्ध होईल आणि त्याचा रिपोर्ट प्रिंट न करता रुग्णाच्या मोबाईलवर पाठवणे शक्य होईल. त्यामुळे रुग्णांचे त्वरित निदान करणे सोपे होणार आहे. भारत सरकार टांकसाळ, मुंबई यांनी सीएसआर निधी उपलब्ध करून दिल्यामुळे हे पोर्टेबल एक्स रे मशीन उपलब्ध झाले आहेत. त्याचा फायदा आरोग्य शिबिरांनाही होणार आहे. त्यामुळे येत्या काळात अशी आरोग्य शिबिरे आयोजित केली जातील. त्याचा नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन उपायुक्त (आरोग्य) उमेश बिरारी यांनी केले आहे.

### राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य समता दिंडी

(पान १ वरून) करण्यासाठी विद्यार्थ्यांनी नशा बंदीची घोषणा दिली तसेच नशा बंदी संदर्भातील फलक दाखवून माहिती देऊन जनजागृती केली. नशा मुक्तीसाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शपथ घेतली. या प्रसंगी अंमली पदार्थाच सेवन लहान मुलांमध्ये वाढत आहे, यासाठी जनजागृती करण गरजेचे आहे.

सामाजिक चळवळ उभी करणे गरजेचे आहे. प्रौढ व्यक्तींनी देखील व्यसनापासून दूर राहावे तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी समतेचा संदेश दिला आहे त्या तत्वांची अमंलबजाणी करणे ही काळाची गरज आहे. चांगला समाज घडवण्यासाठी मोलाचे योगदान द्यावे असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र) अविनाश फडतरे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संजय बागुल, कृषि विकास अधिकारी रामेश्वर पाचे, उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) भाऊराव मोहिते, उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक) कुंदा पंडीत व इतर अधिकारी तसेच बा.ना. बादोडकर महाविद्यालयातील व गौतम हिंदी विद्यालय येथिल विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

मराठी ग्रंथसंग्रहालय येथून प्रचार फेरी सुरू होऊन ठाणे रेल्वे स्टेशन रोड मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून शिवाजी पथ मार्गे जांभळी नाका येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून टेंभीनाका मार्गे कोर्टनाका येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले.

व्यसन मुक्त भारत घडवण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करायला हवे. व्यसन कोणत्याही गोष्टीचे असल्याने आपल्याला हानी होतेच अति मोबाईलचा वापर देखील योग्य नाही असे प्रतिपादन समाज कल्याण विभाग प्रमुख मा. श्री. संजय बागुल यांनी केले.

तसेच कवी रघुनाथ बापू देशमुख यांनी कविता सादरीकरण करून जनजागृती केले. तंबाखू व इतर व्यसनापासून लांब राहून आरोग्य सुदृढ ठेवण्याचा संदेश त्यांनी दिला. या कार्यक्रमासाठी विस्तार अधिकारी लक्ष्मण सुरोशे व दिलीप ओंकारेश्वर यांनी उत्तम नियोजन केले.

### आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त ठाणे पोलिसांची जनजागृती

(पान १ वरून) प्रवृत्ती आणि संस्कृतीला चाप लावण्यासाठी ठाणे पोलीस आयुक्तालय कशोशीने प्रयत्न करीत आहे. त्यात ठाणेकरांमध्ये जनजागृती व्हावी म्हणून आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त ठाणे पोलिसांनी बुधवार (ता–२६ जून) ते शनिवार (ता–२९ जून) पर्यंत आयुक्तालयाच्या हद्दीतील महाविद्यालये, शाळा, बाजारपेठ आदी ठिकाणी अमली पदार्थ मानवी आरोग्याला किती हानिकारक आहे याबाबत जनजागृती करणार आहेत. बुधवारी ठाण्याच्या ननजीभाई खिमजीभाई ठाणावाला कॉलेजच्या विद्यार्थ्यांची अंमलीपदार्थ व त्याचे दुष्परिणाम याबाबत रॅलीची सुरुवात कार्नाय्त आली.

# कोकण विभाग मतदार संघात ५९.३१ टक्के मतदान

(पान १ वरून) रत्नागिरी जिल्ह्यातून ६३.३५ टक्के मतदान झाले, सिंधुदुर्ग जिल्ह्यातून ७३.६२ टक्के मतदान झाले, एकूण कोकण विभाग पदवीधर मतदार संघातील एकूण मतदान ५९.३१ टक्के झाले.

या निवडणुकीत ठाणे जिल्ह्यातून सर्वाधिक मतदार असून ठाणे जिल्ह्यात ९८ हजार मतदार आहेत तर रायगड जिल्ह्यात ५४ हजार मतदार आहेत. पालघर जिल्ह्यातून २८ हजार मतदार, रत्नागिरी जिल्ह्यात २२ हजार मतदार तर सिंधुदुर्गात १८ हजार मतदार आहेत.

विविध जिल्ह्यात कोकण पदवीधर मतदारसंघातील मतदानाला चांगला प्रतिसाद मिळाला. पदवीधर मतदार सकाळपासूनच मतदान केंद्रावर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत आपला मतदानाचा हक्क बजावताना दिसले.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीत कोकण वगळता उर्वरीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा प्रभाव दिसून आला होता. त्यामुळे कोकणातील या मतदारसंघात मतदारांचा कौल महायुतीच्या बाजूने राहणार का याकडेही सर्वांचे लक्ष असणार आहे.

या निवडणुकीत महायुतीचे भाजप प्रणित उमेदवार निरंजन वसंत डावखरे आणि महाविकास आघाडीचे रमेश किर या उमेदवारांमध्ये चुरशीची लढत होणार आहे. या निवडणुकीतही अनेक आरोप प्रत्यारोप पाहायला मिळाले. आज १३ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद झाले असून या निवडणुकीत कोण बाजी मरणार हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

काल सकाळी ७ पासून मतदानाला सुरुवात झाली आजच्या मतदानासाठी पदवीधरांना मतदान केंद्रांपर्यंत आणण्यासाठी उमेदवारांना मोठी कसरत करावी लागली. पदवीधर तसेच शिक्षक मतदारसंघांत नोंदणी केलेल्या मतदारांना मतदानाचा हक्क बजाविण्यासाठी शासनाने विशेष सुट्टी मंजूर केली होती.

### महाराष्ट्र विधान परिषदेच्या चार जागांसाठी आज मतदान

मुंबई – मुंबई : महाराष्ट्र विधान परिषदेच्या चार जागांसाठी काल मतदान झाले. यात दोन शिक्षक तर दोन पदवीधर मतदार संघाचा समावेश आहे. मुंबई आणि कोकण पदवीधर मतदार संघ, तर नाशिक आणि मुंबई शिक्षक मतदार संघात ही निवडणूक पार पडली. या चारही जागांची मुदत ७ जुलै २०२४ रोजी संपणार आहे. या चारही मतदारसंघात शांततेत मतदान पार पडले. यावेळी अनिल परब यांच्यासाठी उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांनी मतदान केलं.

**मुंबईत मैत्रीपूर्ण लढत –** मुंबई पदवीधर मतदारसंघात शिवसेना ठाकरे गटाचे अनिल परब आणि भाजपचे किरण शेलार यांच्यात थेट लढत होत आहे. मुंबई शिक्षक मतदार संघामध्ये शिवसेना ठाकरे गटाचे ज. मो. अभ्यंकर यांच्याविरोधात भाजपचे शिवनाथ दराडे रिंगणात आहे. तसेच सुभाष मोरे (शिक्षक भारती), शिवसेना शिंदे गट पुरस्कृत उमेदवार शिवाजी शेंडगे आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे शिवाजी नलावडे रिंगणात आहे. यामुळे मुंबईत महायुतीमध्ये मैत्रीपूर्ण लढत आहे.

### विधानपरिषद निवडणुकीत कोण कोण रिंगणात?

**मुंबई शिक्षक मतदार संघामध्ये पाच उमेदवारांमध्ये लढत**

- ज. मो. अभ्यंकर : शिवसेना ठाकरे गट
- शिवनाथ दराडे : भाजप
- सुभाष मोरे : शिक्षक भारती
- शिवाजी शेंडगे : शिवसेना शिंदे गट पुरस्कृत उमेदवार
- शिवाजी नलावडे : राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट

**मुंबई पदवीधर मतदारसंघातील प्रमुख उमेदवार**

- अनिल परब शिवसेना ठाकरे गट
- किरण शेलार : भाजप

**कोकण पदवीधर मतदारसंघ**

- निरंजन डावखरे : भाजप
- रमेश कीर : काँग्रेस

**नाशिक शिक्षक मतदारसंघ :**

- किशोर दराडे : शिवसेना
- विवेक कोल्हे : अपक्ष
- संदीप गुळवे : शिवसेना ठाकरे गट
- महेंद्र भावसार : राष्ट्रवादी काँग्रेस

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
संपादक : गणेश चंद्रकांत भोईटे



## हिंदुस्तान पेट्रोलियम

■ पद
१ मेकॅनिकल इंजिनिअर
२ इलेक्ट्रिकल इंजिनिअर
३ इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअर
४ सिव्हिल इंजिनिअर
५ केमिकल इंजिनिअर
६ सिनियर ऑफिसर (CGD)
७ सिनियर ऑफिसर (CGD) Projects
८ सिनियर ऑफिसर/असिस्टंट मॅनेजर (Non-Fuel Business)
९ सिनियर मॅनेजर (Non-Fuel Business)
१० मॅनेजर (Technical)
११ मॅनेजर (Sales- RD Product Commercialisation)
१२ डेप्युटी जनरल मॅनेजर (Catalyst Business Development)
१३ चार्टर्ड अकाउंटेंट (CA)
१४ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर
१५ IS ऑफिसर
१६ IS सिक्योरिटी ऑफिसर- Cyber Security Specialist
१७ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर

■ शैक्षणिक पात्रता: UR/OBC/EWS: ६०% गुण, SC/ST/PWD:५०% गुण
पद क्र.१: मेकॅनिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.२: इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअरिंग पदवी
पद क्र.४: सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.५: केमिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ०२/०५ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ११ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) इंजिनिअरिंग पदवी (Chemical/ Polymer /Plastics Engineering) (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.१२: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) १८ वर्षे अनुभव
पद क्र.१३: CA
पद क्र.१४: (i) M.Sc. (Chemistry (-nalytical/ Physical / Organic/Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१५: (i) B.Tech. (Computer Science/ IT Engineering) / MCA किंवा डाटा सायन्स पदव्युत्तर पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Computer Science/ Information Technology/ Electronics Communications Engineering/ Information Security)/ MCA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.१७: (i) M.Sc. (Chemistry-Analytical / Physical / Organic/ Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१ ते ५: २५ वर्षांपर्यंत
पद क्र.६ ७: २८ वर्षांपर्यंत
पद क्र.८: २९/३२ वर्षांपर्यंत
पद क्र.९: ३८ वर्षांपर्यंत
पद क्र.१०: ३४ वर्षांपर्यंत
पद क्र.११: ३६ वर्षांपर्यंत
पद क्र.१२: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.१३: २७ वर्षांपर्यंत
पद क्र.१४ १७: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.१५: २९ वर्षांपर्यंत
पद क्र.१६: ४५ वर्षांपर्यंत
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ Fee: General/OBC-NC/EWS: ११८०/- SC/ST/PWD: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ वेबसाईट: https://www.hindustanpetroleum.com/

## सीमा सुरक्षा दल

■ पद क्र.
१ सब इंस्पेक्टर (Master)
२ सब इंस्पेक्टर (Engine Driver)
३ हेड कॉन्स्टेबल (Master)
४ हेड कॉन्स्टेबल (Engine Driver)
५ कॉन्स्टेबल (Crew)
६ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Mechanic (Diesel/Petrol Engine)
७ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Electrician
८ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) -C Technician
९ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Electronics
१० हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Machinist
११ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Carpenter
१२ हेड कॉन्स्टेबल (Work Shop) Plumber

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) १२वी उत्तीर्ण (ii) 2nd क्लास मास्टर प्रमाणपत्र
पद क्र.२: (i) १२वी उत्तीर्ण (ii) 1st क्लास इंजिन ड्रायव्हर प्रमाणपत्र
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण (ii) सेरंग प्रमाणपत्र
पद क्र.४: (i) १२वी उत्तीर्ण (ii) 2nd क्लास इंजिन ड्रायव्हर प्रमाणपत्र
पद क्र.५: (i) १०वी उत्तीर्ण (ii) 265 HP च्या खाली बोट चालवण्याचा एक वर्षाचा अनुभव (iii) कोणत्याही मदतीशिवाय खोल पाण्यात पोहणे माहित असले पाहिजे.
पद क्र.६ ते १२: (i) १०वी उत्तीर्ण (ii) ITI डिप्लोमा Motor Mechanic (Diesel/Petrol Engine), Electrician, AC Technician, Electronics, Machinist, Carpentry Plumbing

■ वयाची अट: SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१ २: २२ ते २८ वर्षे
पद क्र.३ ते १२: २० ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: SC/ST: फी नाही
पद क्र.१ २: General/OBC/EWS: २००/-
पद क्र.३ ते १२: General/OBC/EWS: १००/-
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०१ जुलै २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.bsf.gov.in/

## इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्र

■ पदाचे नाव :
१ सायंटिफिक ऑफिसर/E
२ सायंटिफिक ऑफिसर/D
३ सायंटिफिक ऑफिसर/C
४ टेक्निकल ऑफिसर
५ सायंटिफिक असिस्टंट/C
६ नर्स/-
७ सायंटिफिक असिस्टंट/B
८ फार्मासिस्ट
९ टेक्निशियन

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) M.B.B.S. (ii) M.S./ M.D. (iii) ०४ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) MBBS (ii) M.D.S./ B.D.S./M.D./M.S. (iii) ०३/०५ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) M.B.B.S. (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.४: ५०% गुणांसह फिजिओथेरपी P.G.पदवी
पद क्र.५: ५०% गुणांसह MSW
पद क्र.६: B.Sc.(Nursing) किंवा १२वी उत्तीर्ण + -NM²
पद क्र.७: ६०% गुणांसह B.Sc. (Medical Lab Technology) किंवा ६०% गुणांसह PG DMLT किंवा B.Sc. (Radiography) किंवा ५०% गुणांसह B.Sc. + रेडिओग्राफी डिप्लोमा किंवा ६०% गुणांसह B.Sc. (Nuclear Medicine Technology) + ५०% गुणांसह B.Sc. + DMRIT/ DNMT/DFIT
पद क्र.८: (i) १२वी उत्तीर्ण (ii) फार्मसी डिप्लोमा
पद क्र.९: (i) ६०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Science). (ii) Plaster / Orthopaedic Technician/ ECG Technician/ Cardio Sonography / Echo Technician प्रमाणपत्र

■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते ५० वर्षे
पद क्र.२: १८ ते ४० वर्षे
पद क्र.३ ते ७: १८ ते ३५ वर्षे
पद क्र.८ ९: १८ ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: कल्पाक्कम (तमिळनाडु)
■ फी : SC/ST/महिला: फी नाही
पद क्र.१ ते ३: ३००/-
पद क्र.४ ते ६: २००/-
पद क्र.८ ९: १००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.igcar.gov.in/

## राष्ट्रीय केमिकल्स फर्टिलायझर्स लि.

■ पदाचे नाव तपशील: १ मॅनेजमेंट ट्रेनी केमिकल/मेकॅनिकल / इलेक्ट्रिकल/इन्स्ट्रुमेंटेशन /सिव्हिल/फायर/CC लॅब/ इंडस्ट्रियल/मार्केटिंग/ HR/ ट्रेनी एडमिन/कॉर्पोरेट कम्युनिकेशन १५८
■ शैक्षणिक पात्रता: ६०% गुणांसह B.E./B.Tech. (केमिकल/मेकॅनिकल/इलेक्ट्रिकल/इन्स्ट्रुमेंटेशन/सिव्हिल) किंवा डिप्लोमा किंवा कोणत्याही शाखेतील पदवी+MBA
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी १८ ते २७ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: मुंबई
■ Fee: General/OBC/EWS: 1000/- SC/ST/ ExSM²/महिला:फी नाही
■ महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०१ जुलै २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.rcfltd.com/

## आयबीपीएस भरती

■ जागा : ९९९५ जागा
■ पदाचे नाव:
१ ऑफिस असिस्टंट (Multipurpose)
२ ऑफिसर स्केल-I
३ ऑफिसर स्केल-II (General Banking Officer)
४ ऑफिसर स्केल-II (IT)
५ ऑफिसर स्केल-II (C-)
६ ऑफिसर स्केल-II (Law)
७ ऑफिसर स्केल-II (Treasury Manager)
८ ऑफिसर स्केल-II (Marketing Officer)
९ ऑफिसर स्केल-II (-griculture Officer)
१० ऑफिसर स्केल-III

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: कोणत्याही शाखेतील पदवी.
पद क्र.२: कोणत्याही शाखेतील पदवी.
पद क्र.३: (i) ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी. (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) ५०% गुणांसह पदवी (Electronics/ Communication/Computer Science/ Information Technology) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.५: (i) CA (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.६: (i) ५०% गुणांसह विधी पदवी (LLB) (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) CA/MBA (Finance) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.८: (i) MBA (Marketing) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.९: (i) ५०% गुणांसह पदवी (Agriculture/ Horticulture/ Dairy/ Animal Husbandry/ Forestry/ Veterinary Science/ Agricultural Engineering/ Pisciculture) (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी. (ii) ०५ वर्षे अनुभव

वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते २८ वर्षे
पद क्र.२: १८ ते ३० वर्षे
पद क्र.३ ते ९: २१ ते ३२ वर्षे
पद क्र.१०: २१ ते ४० वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी :
पद क्र.१: General/OBC: ८५०/- SC/ST/ PWD/ExSM²: १७५/-
पद क्र.२ ते १०: General/OBC: ८५०/- SC/ST/PWD: १७५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २७ जून २०२४
■ परीक्षा:
पूर्व परीक्षा: ऑगस्ट २०२४
एकल/मुख्य परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
■ अर्ज
पद क्र.१: https://ibpsonline.ibps.in/rrb13oamay24/
पद क्र.२ ते १०: https://ibpsonline.ibps.in/rrbxiiimay24/

# तुम्हीही थंडगार 'मोहब्बत का शरबत' पिताय का?

### थांबा लक्षात घ्या आहारतज्ज्ञांनी सांगितलेला धोका

'मोहब्बत का शरबत' हा सरबत तरुणाईमध्ये खूपच प्रसिद्ध आहे. खरंतर या सरबताचं नाव ऐकताच तरुणाई याकडे आकर्षित होते. हे सरबत कलिंगड, दूध आणि साखर यांपासून बनवलेलं असते. कलिंगडामधे असलेल्या पोषक तत्त्वांमुळे कलिंगड हे अनेक कारणांनी आरोग्यास फायदेशीर ठरतं. डोळे, हाडं, हदय व स्नायूंचं आरोग्य जपण्यासाठी कलिंगड हे खूप उपयुक्त ठरतं. कलिंगडाचं सरबत यासाठी जास्त प्रभावी मानलं जातं. पण, बाहेर मिळणारं अतिसाखर आणि प्रिझर्व्हेटिव्ह घातलेलं कलिंगडाचं सरबत हे हानिकारक ठरू शकतं. मोहब्बत का शरबत म्हणून फेमस असलेलं सरबत तरुणाईला अधिक आवडत असलं तरी ते आपल्यासाठी आरोग्यदायी आहे का? जाणून घेऊ.

फळांमधे कलिंगड हे अनेकांचं आवडतं फळ. रसरशीत, लाल रंगाचं आणि गोड चवीचं कलिंगड उन्हाची काहिली कमी करतं. उन्हामुळे सतत लागणारी तहान नियंत्रित करण्याचं काम कलिंगड करीत असतं. पण, कलिंगडऐवजी जेव्हा आपण त्याचा रस पितो तेव्हा किंवा वेगवेगळ्या फळांचा रस पितो तेव्हा त्याची योग्य पद्धत माहिती असणे गरजेचे आहे. याचसंदर्भात मुंबई सेंट्रलच्या वोक्हार्ट हॉस्पिटलमधील मुख्य आहारतज्ज्ञ अमरीन शेख यांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.

### दूध आणि कलिंगड यांचं एकत्र मिश्रण विषारी

आयुर्वेदानुसार दूध आणि कलिंगड यांचं एकत्र मिश्रण हे विषारी ठरते. त्याचा दीर्घकाळ आपल्या पचन क्षमतेवर परिणाम होतो. दुधाबरोबर कधीही कलिंगडासारखी रसाळ फळं एकत्र करू नका, असा सल्ला आहारतज्ज्ञ सेतिया यांनी इन्स्टाग्रामवर व्हिडीओ शेअर करत दिला आहे. यावर पोषणतज्ज्ञ आरोशी अग्रवाल सांगतात, कलिंगड आणि दूध एकत्र खाल्ल्यानं पचनाशी संबंधित समस्या निर्माण होतात. त्यामुळे केवळ आतड्यांनाच त्रास होतो, असे नाही. तर पचनाच्या समस्यादेखील उदभवू शकतात.

### कलिंगडाच्या रसामध्ये दूध मिसळल्याने काय होतं?

पुण्याच्या मणिपाल हॉस्पिटलमधील वरिष्ठ आहारतज्ज्ञ प्रियंका बांदल सांगतात की, कलिंगडाच्या रसामध्ये दूध मिसळल्याने मलईयुक्त पेय तयार होऊ शकते; परंतु ते पचनासाठी योग्य नाही. कारण हे मिश्रण काही लोकांच्या पचनशक्तीच्या भिन्नतेमुळे पोटात समस्या निर्माण करू शकते. त्यामुळे मोहब्बत का शरबत यांसारखे ज्यूस पिण्यापेक्षा फक्त कलिंगड खाणं उत्तम असा सल्ला वरिष्ठ आहारतज्ज्ञ प्रियंका बांदल देतात.

### मधुमेहाचा धोका वाढू शकतो

मुंबई सेंट्रलच्या वोक्हार्ट हॉस्पिटलमधील मुख्य आहारतज्ज्ञ अमरीन शेख सांगतात, मोहब्बत का शरबत या सरबतामध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते; जे वजन वाढण्यास कारणीभूत ठरू शकते आणि जास्त प्रमाणात सेवन केल्यास मधुमेहाचा धोका वाढू शकतो.
मुंबई सेंट्रलच्या वोक्हार्ट हॉस्पिटलमधील मुख्य आहारतज्ज्ञ अमरीन शेख सांगतात, अशा प्रकारचे सरबत पिण्याआधी काही गोष्टी लक्षात घेणे गरजेचे आहे. हे सरबत रोज पिऊ नका. तर अधूनमधून त्याचा आनंद घ्या. सरबत पिताना त्यात साखरेचं प्रमाण कमी करा. अशा प्रकारे फळांच्या सरबतमध्ये दूध किंवा दुधजन्य पदार्थ टाकू नका, असा सल्ला आहारतज्ज्ञ शेख देतात. मात्र ज्यांना मोहब्बत का शरबत आवडतो त्यांनी प्रमाणात याचं सेवन करुन त्यामध्ये साखरेचं प्रमाणही कमी करावं असं आहारतज्ज्ञ अमरीन शेख सांगतात.





# भारताच्या पुरुष हॉकी संघाची घोषणा

आगामी पॅरिस ऑलिम्पिकसाठी आज (दि.२६) भारतीय पुरुष हॉकी संघाची घोषणा करण्यात आली. २६ जुलै ते ११ ऑगस्ट २०२४ या कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेत भारतीय पुरुष हॉकी संघाचे नेतृत्त्व हरमनप्रीत सिंग करणार आहे. मिडफिल्डर हार्दिक सिंग उपकर्णधार असेल. हरमनप्रीत सिंग हा तिसर्यांदा ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होणार आहे. अभिषेक, सुखजीत सिंह, ललित कुमार उपाध्याय, मनदीप सिंह आणि गुरुजंत सिंह या अनुभवी खेळाडूंबरोबरच गोलकीपर कृष्ण बहादुर पाठक, मिडफिल्डर नीलकांत शर्मा आणि डिफेंडर जुगराज सिंह यांच्या सहभागाने संघ अधिक मजबूत झाला आहे. विशेष म्हणजे, यंदा जरमनप्रीत सिंह, संजय, राज कुमार पाल, अभिषेक आणि सुखजीत सिंह हे पाच युवा खेळाडू प्रथम ऑलिम्पिक स्पर्धेत खेळणार आहेत.
संघ निवडीबाबत बोलताना भारतीय हॉकी संघचे मुख्य प्रशिक्षक क्रेग फुल्टन म्हणाले की, ऑलिम्पिक संघात निवडलेल्या खेळाडूने आपलं कौशल्य, समर्पण आणि लवचिकता दाखवली आहे. या संघात निवडलेला गेलेला प्रत्येक खेळाडू हा कठोर परीश्रम घेत आहे. हा संघ अनुभवी खेळाडू आणि आश्वासक युवा प्रतिभांचा एक परिपूर्ण मिश्रण आहे. आता आम्ही पॅरिसमध्ये जगातील सर्वोत्तम संघांना सामोरे जाण्यासाठी तयार आहोत.

### पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारत ब गटात

यंदाच्या पॅरीस ऑलिम्पिकमध्ये भारतीय संघ हा बेल्जियम, ऑस्ट्रेलिया, अर्जेंटिना, न्यूझीलंड आणि आयर्लंडसह ब गटात आहे. उपांत्यपूर्व फेरीत जाण्यासाठी संघाला पहिल्या चार संघात स्थान मिळवावे लागले. यंदा ऑलिम्पिकसाठी एकूण १२ संघ पात्र ठरले आहेत. अ गटामध्ये नेदरलँड, जर्मनी, ग्रेट ब्रिटन, स्पेन, दक्षिण आफ्रिका आणि यजमान फ्रान्स या संघांचा समावेश आहे.




समता, बंधुता, मानवता यांची स्वकृतीतून प्रचिती देत सामाजिक न्यायाचे राज्य करणारे लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीदिनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयात नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, अतिरिक्त आयुक्त तथा शहर अभियंता शिरीष आरदवाड, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, समाजविकास विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे आणि इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे जयंती निमित्त त्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी.



सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात भरीव सुधारणा करणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्ताने पनवेल पालिकेच्या मुख्यालयात आज (२६ जून) राजर्षी छ. शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.सदर कार्यक्रमास अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त मारूती गायकवाड, उपायुक्त बाबासाहेब राजळे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, अभियंता नितीन हुद्दार,जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, महापालिका अधिकारी, कर्मचारी, पत्रकार, नागरिक उपस्थित होते.




राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त आज कल्याण-डोंबिवली महापालिकेतर्फे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. महापालिका मुख्यालयात विभागप्रमुख (माहिती व जनसंपर्क) संजय जाधव यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित अतिरिक्त आयुक्त - १ प्रल्हाद रोडे, महापालिका सचिव तथा उपायुक्त वंदना गुळवे, कार्यकारी अभियंता योगेंद्र राठोड, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सहा.सुरक्षा अधिकारी सुरेश पवार तसेच इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.

# क्षयरोग कार्यक्रमात हुमाना समाजसेवी संस्थेचे कार्य फार महत्त्वाचे : पालिका आयुक्त अजय वैद्य

भिवंडी : भिवंडी शहरात सातत्याने क्षयरोग रुग्ण सापडत असतात. या क्षयरोग रुग्णांच्या करता पालिकेचा वैद्यकीय आरोग्य विभाग व राज्य शासन क्षयरोग विभाग हे सातत्याने प्रयत्न करीत आहेत. पण शासनाच्या या कार्यक्रमाला मर्यादा येतात, त्या वेळेला अनेक सामाजिक संस्थांची मदत लागत असते. या करता सातत्याने समाजामध्ये जनजागृती करणारे काम देखील महत्त्वाचे आहे. हुमाना सामाजिक संस्था शहरातील टी.बी रुग्णांकरता धावून आली. हूमाना समाजसेवी संस्था यांनी भिवंडी शहरात गेली एक वर्ष क्षयरोग शोध मोहीम, प्रचार व प्रसार यासाठी चांगले काम केले, चांगल्या प्रकारे जनजागृती केली क्षय रुग्ण शोध घेणे, त्यांच्यावर लक्ष देणे, क्षयरोग मुक्ती करता प्रचार व प्रसार करणे इत्यादी काम या संस्थेने चांगल्या प्रकारे केलेले आहे. हुमाना समाजसेवी संस्था गेली एक वर्षभर क्षयरोगावर काम करीत होते. या संस्थेचा पालिका क्षेत्रातील एक वर्षाचा काळ संपल्याने



हूमाना समाजसेवी संस्थेच्या वतीने समारोप समारंभाचे आयोजन पालिका मुख्यालयातील स्वर्गीय विलासराव देशमुख सभागृहात करण्यात आले होते. या वेळेला पालिका आयुक्त अजय वैद्य बोलत होते.

या वेळेला व्यासपीठावर भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख , पालिका अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त मुख्यालय नयना ससाणे, उपायुक्त कर अजय एडके, तसेच संजीव भट हुमाना संस्थेचे बोर्ड ऑफ डायरेक्टर, जहांगीर आलम नॅशनल प्रोजेक्ट दिल्ली प्रतिनिधी आणि महानगरपालिकेचे शहर क्षयरोग अधिकारी डॉक्टर बुशरा सय्यद उपस्थित होते.

पालिका आयुक्त पुढे म्हणाले की, शहरात काम करताना अनेक सामाजिक संस्थांची गरज लागते. अशा वेळी हुमाना संस्थेची फार मोठी मदत झाली. क्षय रुग्ण शोधणे व त्यावर उपचार करणे फार कठीण काम आहे ते अद्यापही पूर्ण झालेले नाही अद्यापही आपल्याला रुग्ण सापडत आहेत. त्यांच्यावर उपचार करण्याची गरज आहे. टीबी आजाराकडे दुर्लक्ष करू नये, टी.बी च्या उपचार करिता पोर्टेबल एक्स-रे मशीन खरेदी करणे हा देखील प्रस्ताव आपण मंजूर केलेला आहे. टी.बी मुक्त भिवंडी व टी.बी.मुक्त भारत हे आपल्या देशाचे मुख्य उद्दिष्ट आहे आपण सर्वजण टी. बी मुक्त भारत करणारच आहोत या कामी वेगवेगळ्या सामाजिक संस्थांच्या सहकार्य नेहमीच लाभणार आहे. हूमाना सामाजिक संस्थेने केलेल्या कार्य फार महत्त्वाचे आहे.त्याची दखल पालिकेने घेणे आवश्यक आहे असेही पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी नमूद केले.

तर भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख यांनी नमूद केले की, भिवंडी सारख्या दाटीवाटीच्या शहरात जेथे मोठ्या प्रमाणात झोपडपट्टी व बहुभाषिक, संमिश्र वस्ती असलेल्या ठिकाणी टीबीचे रुग्ण शोध घेणे व त्यांच्यावर उपचार करणे यासारखे, टीबी विषयी जनजागृती करणे ही सर्व काम हूमाना सामाजिक संस्थेने चांगल्या प्रकारे पार पाडले. हे खरोखर कौतुकास्पद आहे, त्यांच्या या कार्यामुळे भिवंडीतील टीबी रुग्णांची निश्चित संख्या कमी झालेली आहे याची दखल देखील घेणे आवश्यक आहे. त्यांनी केलेल्या कामाबद्दल त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. सदर कार्यक्रमाला महानगरपालिकेचे वैद्यकीय आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अवैध वाळू उपसा करणाऱ्या बार्जवर

## भिवंडी तहसील कार्यालयाची कारवाई

ठाणे : अवैध वाळू उपसाविरोधात आज जिल्हा प्रशासनाच्या भिवंडी उपविभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काल्हेर ते कोन येथील खाडीपात्रात कारवाई करून १ बार्ज, १ संक्शन जप्त करून ते नष्ट केले. या कारवाईतील मुद्देमालाची अंदाजे किंमत २४.०० लाख असून, यासंबंधी गुन्हा नोंद करण्याची कारवाई करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या आदेशान्वये व अपर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे आणि उपविभागीय अधिकारी भिवंडी यांच्या निर्देशानुसार आज दि. २६.६.२०२४ रोजी सकाळी ९.०० वा काल्हेर ते कोन येथील खाडीपात्रात खारबाव मंडळ अधिकारी व भिवंडी मंडळ अधिकारी व त्यांच्या अधिनस्त तलाठी यांच्या मार्फत संयुक्त कार्यवाही करण्यात आली या कारवाईमध्ये १ बार्ज, १ संक्शन आढळून आले. बार्जवरील कामगार पथकाची चाहूल लागताच पाण्यात उडी मारून पसार झाले. पळून जाण्यापूर्वी बार्ज वॉल काढण्यात आल्याने व बोटीच्या सहाय्याने ओढून आणणे शक्य नसल्याने तेथेच पाण्यात बुडवण्यात आला. १ सक्शन पंप बोटीच्या साहाय्याने काल्हेर बंदर आणून खाडी किनारी काढून पुन्हा वापर होऊ नये म्हणून गॅस कटर च्या सहाय्याने कट करुन नष्ट करण्यात येत आहे, अशी माहिती तहसीलदार अभिजित खोले यांनी दिली.



धडाकेबाज युवा प्रतिष्ठानच्या वतीने राईट टू एज्युकेशन कायद्याने विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण गणावेश पाठ्यपुस्तके शालेय व्यवस्थापनात तत्काल देणेबाबत पालकांचे बरोबर महानगरपालिकेचे समोर आंदोलन.



महायुतीचे कोकण पदवीधर संघाचे उमेदवार निरंजन डावखरे यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला सोबत आमदार संजय केळकर नीलिमा डावखरे.

काँग्रेसचे शहर उपाध्यक्ष मा. नगरसेवक विलास जोशी यांचा वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा

## उलनचाळ येथील शहरी बेघर निवारा केंद्रातील नागरिकांना फळांचे वाटप

अंबरनाथ : अंबरनाथ शहर ब्लॉक काँग्रेस कमिटीचे शहर उपाध्यक्ष तथा माजी नगरसेवक विलास हरिभाऊ जोशी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पश्चिमेकडील उलनचाल येथील शहरी बेघर निवारा केंद्रातील नागरिकांना फळांचे वाटप करून केंद्रातील नागरिकांची विचारपूस करत त्यांच्यासोबत केक कापून वाढदिवस अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अंबरनाथ शहर ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कृष्णा रसाळ पाटील यांनी प्रमुख उपस्थिती लावली होती. ब्लॉक अध्यक्ष कृष्णा रसाळ पाटील व माजी नगरसेवक विलास जोशी यांच्या हस्ते केंद्रातील नागरिकांना फळांचे वाटप करण्यात आले.





त्यानंतर विलास जोशी यांच्या जनसंपर्क कार्यालय येथे वाढदिवसानिमित्त एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष ॲड. यशवंत जोशी, अध्यक्ष कृष्णा रसाळ पाटील, जमसु नजरत, रोहितकुमार प्रजापती, धनंजय सुर्वे, अशोक धनगर, रफिक खान, नईम खान, अकबर, नवाज वणू, जाफर वणू, लक्ष्मण जाधव, जाफर खान, दादा कोलार, मोहिनुद्दीन वणू, चांद काजी, अली अहमद शेख यांच्यासह अनेक मान्यवर, पदाधिकारी व पत्रकार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून माजी नगरसेवक विलास जोशी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

डोंबिवलीकर फ्रेंडशिप इन २०२४ अंतर्गत १०००० डोंबिवलीकर घेणार सहभाग

## १0000 डोबिंवलीकराची आरोग्यदायी 'मैत्रीची धाव'

डोंबिवली : नामदार रविंद्र चव्हाण यांच्या माध्यमातून, डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार आणि कल्याण, डोंबिवली रनर ग्रुप यांच्या संमुक्त विद्यमाने डोंबिवलीकरांसाठी आरोग्य आणि मैत्री दिनाची सांगड घालत ४ ऑगस्ट २०१४ रोजी कल्याण ऑबिवलीमधील सर्वात मोठ्या डोंबिवलीकर प्रेडशिप रन २०२४ ये आयोजन केले आहे.

चालणे, धावणे किंवा पळणे आरोग्यदायी जीवनाची गुरुकिल्ली आहे. धकाधकीच्या शहरी वातावरणात आपल्या शरीराला व्यायाम अत्यावश्यक आहेच असं आरोग्यविज्ञान सांगते आणि त्यासाठी चालणे, धावणे किंवा पळणे यापेक्षा उत्तम काहीच नाही आणि हाच मूलमंत्र रुजवण्यासाठी नामदार रविंद्र चव्हाण यांनी पुढाकार घेतला आहे.

डोंबिवलीकर फ्रेंडशिप रन २०२४ ही स्पर्धा २१ किमी, १० किमी, ५ किमी आणि १.६ किमीचा फन रन या टप्प्यात आयोजित होणार आहे.

१.६ किमीचा फन रन हे या कार्यक्रमाचं आकर्षण असणार आहे. जेथे ६ वर्षांपासून ते वृद्धापर्यंत सर्वांचा सहभाग असेल. नामदार




रविंद्र चव्हाण आणि कल्याण डोंबिवली रनर ग्रुपतर्फे शाळा, कॉलेज, सामाजिक संस्था इत्यादीनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

यामध्ये सहभाग घेतलेल्या प्रत्येक नागरिकांसाठी हा एक अविस्मरणीय अनुभव ठरावा यासाठी कल्याण डोंबिवली रनर ग्रुप प्रयत्नशील आहे. कल्याण डोंबिवली रनर ग्रुप ५०० मॅरॅथॉनर्स असलेली संस्था गेली ९ वर्ष डोंबिवली कल्याण मध्ये धावण्याची संस्कृती रुजावी आणि वाढीस लागावी यासाठी प्रेरणादायी कार्य करत आहे.

डीबिवली हे संस्कृतीक शहर तर आहेच पण या शहरातील जास्तीत जास्त नागरिकांना तंदुरुस्त बनविण्यासाठी असे उपक्रम आवश्यक असल्याचे मत नामदार रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केले. दिवाळी पहाट आणि गुढीपाडवा स्वागत यात्रा यांसारख्या आकर्षक कार्यक्रमांसाठी ओळखले जाणारे हे शहर आता डोंबिवलीकर फ्रेंडशिप रनच्या माध्यमातून पण ओळखले जावे यासाठी प्रयास आहे. ज्यामुळे डोंबिवली हे फिटनेस उपक्रमांचे केंद्र बनेल याची आम्ही आशा बाळगून आहोत, असे चव्हाण यांनी नमूद केले.

डोंबिवलीकर फ्रेंडशिप रन मधील सहभागींना नामदार रविंद्र चव्हाण आणि सेलिब्रेटी रनर्स भेटण्याची आणि त्यांच्यासोबत धावण्याची संधी मिळणार आहे. हा कार्यक्रम फक्त स्पर्धा नसून आरोग्य आणि मैत्रीचा उत्सव असणार आहे. सहभाग घेणाऱ्या प्रत्येकाला इ प्रमाणपत्र आणि सहभाग पदक मिळणार आहे.

***डोंबिवलीकर फ्रेंडशिप रन :***

*ही धाव अशा उत्साही लोकांसाठी आहे ज्यांनी नुकताच धावण्याचा प्रवास सुरु केला आहे आणि त्यांना भविष्यात १० km आणि २१ km सारख्या शर्यतीमध्ये दीर्घकाळापर्यत प्रगती करायची आहे. त्या सर्वांना शर्यत पूर्ण झाल्यावर पदक आणि ई-प्रमाणपत्र मिळतील.*

***१० km आणि २१ km-***

*या दोन श्रेणी कालबध्द शर्यती आयोजित केल्या आहेत आणि भारतातील सर्व प्रमुख धावण्याच्या इव्हेंटसाठी पात्रता म्हणून प्रमाणित केल्या जातील. अंतर पूर्ण करणाऱ्या सर्व नोंदणीकृत सहभागींना स्पर्धा पूर्णत्वाचे ई-प्रमाणपत्र आणि पदक मिळणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.*

***'फन रन' धाव १मैल (१.६ केएम)***

*रनिंग इव्हेंटचा आनंद घेण्यासाठी आणि अनुभव घेण्यासाठी कुटुंब आणि मित्रांसह ही मजेदार रन असेल आणि पूर्ण झाल्यानंतर त्यांना सहभाग ई-सर्टिफिकेट मिळेल.*

घनकचरा विभागाने सिंगल यूज प्लास्टिकबंदीबाबत केलेल्या कारवाईत

## १ क्विंटलहून अधिक प्लास्टिक जप्त



**ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या घनकचरा विभागामार्फत सिंगल यूज प्लास्टिकबंदीबाबत हाती घेण्यात आलेल्या कारवाई मोहिमेअंतर्गत एकूण १०२ किलो सिंगल यूज प्लास्टिक जप्त करण्यात आले असून ३८ हजार ४५० रु. इतका दंड वसूल करण्यात आला. सदरची कारवाई मंगळवारी (२५/०६/२०२४) घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त तुषार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे व त्यांच्या पथकाने केली.**

सदर कारवाईअंतर्गत विविध प्रभागसमितीतील दुकाने व आस्थापना यांचेकडून सिंगल युज प्लास्टिक जप्त करण्यात आले. कळवा प्रभाग समिती क्षेत्रातून ९ किलो प्लॅस्टिक जप्त करुन एकूण रु. ९ हजार रु. दंड, मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रातून १४ किलो प्लास्टिक जप्त करुन १ हजार ५०० रुपये दंड, दिवा प्रभाग समिती क्षेत्रातून १० किलो प्लास्टिक जप्त करुन ३ हजार ५०० रु दंड, उथळसर प्रभाग समिती क्षेत्रातून ०९ किलो प्लास्टिक जप्त करुन १ हजार रु. दंड, नौपाडा कोपरी प्रभाग समिती क्षेत्रातून १४ किलो प्लास्टिक जप्त करुन ७ हजार रु. दंड, वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रातून १० किलो प्लास्टिक जप्त करुन १ हजार रु. दंड, लोकमान्य सावरकर प्रभागसमिती क्षेत्रातून ९ किलो प्लास्टिक जप्त करुन ५ हजार ७०० रु. दंड, वागळे प्रभाग समिती क्षेत्रातून १३ किलो प्लास्टिक जप्त करुन ७ हजार २५० रु. दंड, माजिवडा मानपाडा प्रभाग समिती क्षेत्रातून १४ किलो प्लास्टिक जप्त करुन २ हजार ५०० रु.दंड वसूल करण्यात आला. महापालिकेच्या ९ प्रभागसमिती क्षेत्रातून एकूण ३८ हजार ४५० रु. दंड वसूल करण्यात आला असल्याची माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली.

सिंगल यूज प्लास्टिकबाबतची कारवाई ही नियमित सुरू राहणार असून नागरिकांनी देखील सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळावा व दुकानदारांनी देखील सिंगल यूज प्लास्टिकची विक्री करु नये असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## तुर्भे विभागात प्लास्टिक प्रतिबंधात्मक धडक मोहीम



तुर्भे : भनवी मुंबई शहर प्लास्टिकमुक्त असण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका सातत्याने विविध माध्यमांतून प्रयत्न करत असून नागरिकांनी प्लास्टिक पिशव्या तसेच एकल वापर प्लास्टिकचा वापर न करण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. यासोबतच प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिमाही राबविण्यात येत असून महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार एकल वापर प्लास्टिक फ्री मार्केट ही संकल्पना राबविली जात आहे. या मार्केटमध्ये नागरिकांच्या सोयीसाठी कापडी पिशव्या वेंडींग मशीन लावण्यात येत आहेत. प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहिम राबवताना तुर्भे विभाग कार्यालयांतर्गत सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी भरत धांडे यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. अजय गडदे आणि परिमंडळ १ चे उपायुक्त श्री. सोमनाथ पोटरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर करणाऱ्या दोन व्यावसायिकांवर कारवाई करत प्रत्येकी रु. ५ हजार प्रमाणे एकूण रू. १० हजार इतकी दंडात्मक रक्कम जमा केली. तसेच सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून अस्वच्छता पसरवणाऱ्या दोन व्यावसायिकांविरुध्द कारवाई करुन प्रत्येकी रु. २५०/- प्रमाणे एकूण रु. ५००/- इतका दंड वसूल केला. या कारवाईमध्ये स्वच्छता अधिकारी जयेश पाटील आणि स्वच्छता निरीक्षक सहभागी होते.

## श्री माँ बालनिकेतन हायस्कूलचे सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण

ठाणे : दिव्य श्री तारा माँ यांनी श्री माँ ट्रस्टच्या माध्यमातून १९७५ साली कोपरी येथे स्थापन केलेल्या श्री माँ बालनिकेतन हायस्कूल आपले सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करत आहे. यानिमित्त वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहे. रविवार, २३ जून २०२४ रोजी शाळेच्या परिसरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी विनामूल्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते.

आरोग्य शिबीरात सामान्य तपासणी, इ.सी. जी., नेत्र तपासणी, बी.एम. डी., हाडांचे आणि दातांचे विकार, उपचार इत्यादी विविध सोयी उपलब्ध करुन देण्यात आल्या. शिबीरात तज्ञ डॉक्टर डॉ. सुंदर कृष्णन, डॉ. उदय गाडगीळ, डॉ. सुबोध मेहता, डॉ. न्याशा, डॉ. जय लालवाणी, डॉ. प्रांजली जोशी, डॉ. रितू छाबरा, डॉ. प्रतिमा शर्मा, डॉ. आनंद शर्मा, डॉ. उदय खोना, डॉ. आर. एन. सुद या ठाणे शहरातील सुप्रसिद्ध तज्ञ डॉक्टरांनी तपासणी केली. आरोग्य शिबिरात माजी विद्यार्थ्यांचाही सहभाग होता.

**वर्षभर विविध सामाजिक उपक्रम**
**राबवून साजरा होणार सुवर्णमहोत्सव**
**ज्येष्ठ नागरिकासांठी मोफत आरोग्य शिबीर संपन्न**



'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१